**बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम, २०१५ च्या कलम ५४ नुसार संस्थांच्या तपासणीसाठी राज्य व जिल्हास्तरावर तपासणी समिती गठित करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**महिला व बाल विकास विभाग**
**शासन निर्णय क्र.बालगृ-२०१७/प्र.क.२११ /का ८**

नवीन प्रशासन भवन, ३ रा मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- २१ मार्च, २०१८.

वाचा : १. बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम, २०१५.
२. केंद्रिय आदर्श बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) नियम ,२०१६.
३. शासन निर्णय बालगृ २०१५/प्र.क्र.५०/का-८ दि. २७ऑक्टोबर, २०१७.
४. महाराष्ट्र राज्य बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) नियम, २०१८.

प्रस्तावना :-

१. केंद्र शासनाचा बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम, २०१५ हा जानेवारी २०१६, पासून देशभरात लागू करण्यात आला आहे. या अधिनियमाच्या कलम ५४ नुसार अधिनियमांतर्गत नोंदणीकृत तसेच मान्यता प्राप्त संस्थांच्या तपासणीसाठी राज्य व जिल्हास्तरावर 'तपासणी समिती' गठित करण्याबाबत तरतूद आहे.

२. बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम, २०१५ अंतर्गतच्या कलम ११० अन्वये राज्य शासनाचे महाराष्ट्र राज्य बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) नियम, २०१८, दि. १३.३.२०१८ च्या अधिसूचनेद्वारा प्रसिद्ध करण्यात आले आहेत. राज्यशासनाच्या सदर नियम ४३ मधील तरतूदी विचारात घेऊन राज्यस्तरीय तपासणी समिती आणि जिल्हास्तरीय तपासणी समिती गठित करण्याबाबतची बाब शासनाच्या विचाराधीन होती .

**शासन निर्णय-:**

१. बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम, २०१५ च्या अनुषंगाने 'विधी संघर्ष ग्रस्त बालके' आणि 'काळजी व संरक्षणाची गरज असलेली बालके' यांच्यासाठी कलम २ (२१) मध्ये नमूद व्याख्येनुसार बालकांना निवासी सेवा पुरविणा-या शासकीय तसेच स्वयंसेवी संस्थांची वेळोवेळी तपासणी करणे आवश्यक आहे. आता या शासन निर्णयान्वये सदर संस्थांच्या तपासणीसाठी खालीलप्रमाणे राज्यस्तरीय तपासणी समिती व जिल्हास्तरीय तपासणी समितीचे गठन करण्यात येत आहे:-

(I) राज्य तपासणी समिती :-

| | | |
|---|---|---|
| १ | सदस्य सचिव महाराष्ट्र राज्य बाल संरक्षण सोसायटीचा तथा आयुक्त, महिला व बाल विकास,आयुक्तालय,पुणे | अध्यक्ष |
| २ | तपासणी समितीच्या अध्यक्षाने नियुक्त केल्याप्रमाणे मंडळातील किंवा समितीतील प्रतिनिधी | सदस्य |
| ३ | राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाचा प्रतिनिधी | सदस्य |
| ४ | राज्य दत्तकग्रहण स्त्रोत संस्था,(SARA), कार्यक्रम व्यवस्थापक | सदस्य |
| ५ | आरोग्य विभागाने शिफारस केलेला वैद्यकीय तज्ज्ञ | सदस्य |
| ६ | तपासणी समितीच्या अध्यक्षाने नियुक्त केल्याप्रमाणे बाल संरक्षण तज्ज्ञ | सदस्य |
| ७ | तपासणी समितीच्या अध्यक्षाद्वारे नियुक्त केलेला स्वयंसेवी संघटनेचा प्रतिनिधी | सदस्य |
| ८ | तपासणी समितीच्या अध्यक्षाद्वारे नियुक्त केलेला नामांकित सामाजिक कार्यकर्ता | सदस्य |
| ९ | उपायुक्त (बाल विकास),महिला व बाल विकास आयुक्तालय,पुणे | सदस्य-सचिव |

उपरोक्त प्रमाणे गठित राज्य तपासणी समिती खालीलप्रमाणे कार्ये करील :-

१. राज्यातील बालकांची काळजी घेणाऱ्या सर्व निवासी संस्थांची महाराष्ट्र राज्य बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) नियम, २०१८ च्या नमुना ४१ नुसार तपासणी करणे.

२. बालकांचे वास्तव्य असलेल्या संस्थांमध्ये काळजी व संरक्षणाची गरज असलेली बालके आहेत याची निश्चिती करण्यासाठी अशा संस्थांची यादृच्छिक (Random) तपासणी करणे.

३. राज्य तपासणी समिती आपला तपासणी अहवाल सचिव, महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांना सादर करील.

४. बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम, २०१५ आणि त्या अनुषंगाने लागू करण्यात आलेले नियम यांच्या तरतुदीनुसार संस्थांची सुधारणा आणि विकासाची कार्यवाही करण्यासाठी महाराष्ट्र राज्य बाल संरक्षण सोसायटी, पुणे किंवा जिल्हा बाल संरक्षण कक्ष यांना शिफारस करणे.

५. बालकांच्या हिताकरिता संस्थेला भेट देऊन बालकांशी संवाद साधणे आणि त्यांचे अभिप्राय घेणे.

(II) जिल्हा स्तरीय तपासणी समिती :-

| | | |
|---|---|---|
| १ | जिल्हा दंडाधिकारी | अध्यक्ष |
| २ | जिल्हा आरोग्य अधिकारी | सदस्य |
| ३ | बाल हक्क, संगोपन, संरक्षण व कल्याण या क्षेत्रात कार्यरत असलेल्या नागरी समूहाचा एक सदस्य | सदस्य |
| ४ | बाल कल्याण समितीचा एक सदस्य | सदस्य |
| ५ | बाल न्याय मंडळाचा एक सदस्य | सदस्य |
| ६ | बालकांसोबत काम करण्याचा अनुभव असलेला एक मानसोपचार तज्ज्ञ | सदस्य |
| ७ | जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी | सदस्य-सचिव |

उपरोक्त प्रमाणे गठित जिल्हा तपासणी समिती खालीलप्रमाणे कार्य करील:-

१. महाराष्ट्र राज्य बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) नियम, २०१८ च्या नमुना ४१ मध्ये जिल्ह्यातील सर्व बालकांची काळजी घेणाऱ्या संस्थांची तपासणी करणे.
२. जिल्हयातील बालकांचे वास्तव्य असलेल्या संस्थांमधील सुविधांची तपासणी किमान तीन महिन्यातून एकदा करणे.
३. जिल्हा तपासणी समिती निष्कर्षाचा अहवाल जिल्हा बाल संरक्षण कक्ष आणि महाराष्ट्र राज्य बाल संरक्षण सोसायटी यांच्या मार्फत आवश्यकतेनुसार राज्य शासनाकडे सादर करणे आणि बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम, २०१५ आणि त्याखाली करण्यात आलेले नियम याच्या तरतुदीनुसार बालकांची काळजी घेणा-या संस्थांची सुधारणा आणि विकास करण्यासाठी सूचना करणे.
४. बालकांच्या हिताकरिता संस्थेला भेट देऊन बालकांशी संवाद साधून त्यांचे अभिप्राय घेणे.
५. जिल्हा बाल संरक्षण कक्ष, जिल्हा तपासणी समितीच्या अहवालावर आवश्यक तो पाठपुरावा करण्याची कार्यवाही करेल आणि कार्यवाहीचा अहवाल महाराष्ट्र राज्य बाल संरक्षण सोसायटी यांचेमार्फत आवश्यकतेनुसार राज्य शासनाकडे सादर करील.

२. राज्यस्तरावरील तपासणी समितीमध्ये अशासकीय व्यक्तींच्या नियुक्ती करीता आयुक्त महिला व बाल विकास आयुक्तालय, पुणे तथा अध्यक्ष ,राज्य तपासणी समिती हे खालीलप्रमाणे कार्यवाही करतील :-

१. अशासकीय व्यक्तींची नामांकने प्राप्त करुन घेण्यासाठी आयुक्त महिला व बाल विकास हे वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करतील.
२. इच्छुक व्यक्तींची नामांकने प्राप्त झाल्यावर त्यांची छाननी करुन योग्य व्यक्तींची तपासणी समिती सदस्य म्हणून अध्यक्ष नियुक्ती करतील.
३. अशासकीय सदस्यच्या नियुक्ती करताना सदर व्यक्ती किमान पदवीधर असून तिला बाल हक्क, काळजी, संरक्षण आणि कल्याण क्षेत्रातील किमान १० वर्षाचा अनुभव आवश्यक राहील.तसेच तिचे वय ३५ पेक्षा कमी व ६५ पेक्षा जास्त नसावे.
४. अशासकीय सदस्यांचा कालावधी नेमणूकीपासून तीन वर्षाचा राहील.

३. जिल्हास्तरावरील तपासणी समितीमध्ये अशासकीय व्यक्तींच्या नियुक्ती करीता जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी अध्यक्ष जिल्हा दंडाधिकारी यांच्या आदेशानुसार खालीलप्रमाणे कार्यवाही करतील :-

१. अशासकीय व्यक्तींची नामांकने प्राप्त करुन घेण्यासाठी जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी स्थानिक वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करतील.
२. इच्छुक व्यक्तींची नामांकने प्राप्त झाल्यावर त्यांची छाननी करुन योग्य व्यक्तींची नियुक्ती करतील.

३. अशासकीय सदस्यच्या नियुक्ती करताना सदर व्यक्ती किमान पदवीधर असून तिला बाल हक्क, काळजी, संरक्षण आणि कल्याण क्षेत्रातील किमान १० वर्षाचा अनुभव आवश्यक राहील.तसेच तिचे वय ३५ पेक्षा कमी व ६५ पेक्षा जास्त नसावे.

४. अशासकीय सदस्यांचा कालावधी नेमणूकीपासून तीन वर्षाचा राहील.

४. अशासकीय सदस्यांना वित्त विभाग शासन निर्णय क्र. बैठक/२०१२- प्र.क्र.१/सेवा-५ दि.२४.५.२०१२ अन्वये बैठक भत्ता व शासन निर्णय क्र.प्रवास/१०१०- प्र.क्र.२/सेवा-५ ,दि ३.३.१० . मधील परिच्छेद-१२ मधील तरतुदीनुसार प्रवास भत्ता अनुज्ञेय राहील. यासाठीचा खर्च एकात्मिक बाल संरक्षण योजने अंतर्गतच्या अनुदानातून भागविण्यात यावा. उपरोक्तप्रमाणे राज्य तपासणी समिती व जिल्हा तपासणी समिती आस्तित्वात येणेबाबत आवश्यक कार्यवाही सर्व संबंधितांनी तातडीने करावी.

५. सदर शासन निर्णय शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संकेतांक २०१८०३२२१५२३२१४४३० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Smita Dattatray Nivatkar

Digitally signed by Smita Dattatray Nivatkar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Women And Child Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=3fa46cf1e928518ffc98619187a1ef6de2dd57c16934e9cb6672cc02aa258b08, cn=Smita Dattatray Nivatkar
Date: 2018.03.22 15:28:32 +05'30'

**(स्मिता निवतकर)**

**उप सचिव,महाराष्ट्र शासन.**

सोबत-नमुना क्र. ४१

**प्रत-**

१) मा.राज्यपाल, यांचे सचिव,राजभवन,मुंबई
२) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय,मुंबई .
३) मा.अध्यक्ष/उपाध्यक्ष विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ. मुंबई .
४) मा.सभापती/उपसभापती विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ. मुंबई .
५) मा.विरोधी पक्ष नेता, विधानसभा/ विधानपरिषद,महाराष्ट्र विधीमंडळ.
६) मा.मंत्री (म व बा वि)/ राज्यमंत्री (म व बा वि),यांचे खाजगी सचिव ,मंत्रालय ,मुंबई .
७) मा.मुख्य सचिव,महाराष्ट्र राज्य यांचे उपसचिव,मंत्रालय,मुंबई
८) अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग, यांचे वरिष्ठ स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
९) अपर मुख्य सचिव, महिला व बाल विकास विभाग, नवीन प्रशासकीय भवन, मुंबई.
१०) प्रधान सचिव (व्यय),वित्त विभाग,मंत्रालय,मुंबई
११) प्रधान सचिव (ले व को),वित्त विभाग,मंत्रालय,मुंबई
१२) आयुक्त , महिला व बाल विकास आयुक्तालय,म.रा. पुणे.
१३) महालेखापाल १, महाराष्ट्र राज्य (लेखापरीक्षा / लेखा व अनुज्ञेयता),मुंबई
१४) महालेखापाल २, महाराष्ट्र राज्य (लेखापरीक्षा / लेखा व अनुज्ञेयता),नागपूर

१५) संचालक,लेखा व कोषागरे संचालनालय,म.रा.मुंबई
१६) संचालक,स्थानिक निधी लेखा परीक्षा,कोकण भवन,नवी मुंबई
१७) सर्व उपसचिव ,सर्व अवर सचिव, महिला व बाल विकास. नवीन प्रशासकीय भवन , मुंबई
१८) उपायुक्त (बालविकास) महिला व बाल विकास आयुक्तालय, म.रा.पुणे.
१९) वित्त विभाग (व्यय-६/अर्थसंकल्प-७/कोषा-प्रशा-२), नियोजन विभाग (का-१४७२) मंत्रालय,मुंबई -३२,
२०) सर्व जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी.
२१) सर्व कार्यासने, महिला व बाल विकास विभाग, नवीन प्रशासकीय भवन , मुंबई
२२) निवड नस्ती का-८

# नमुना ४१

## [नियम (३)४३आणि नियम (९)४३पहा ]

## तपासणी समितीव्दारे तपासणी

(योग्य असेल ते भरावे)

भेटीचा दिनांक ------------------- भेटीची वेळ -------------------

संस्था तपासणी करणाऱ्या अधिकाऱ्यांचे नावे

१. ------------------------------
२. -------------------------------
३. -------------------------------

**अ. सर्वसामान्य माहिती**

i. संस्थेचे नाव पत्ता

-------------------------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------------------------

ii नोंदणी क्र (बाल न्याय अधिनियम २०१५ अंतर्गत)

निर्गमित केल्याचा दिनांक -----------------------

मुदत संपत असल्याचा दिनांक -------------------

iii. बालकांची काळजी घेणाऱ्या संस्थेचा संपूर्ण पत्ता ---------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------------------

iv. अधिकाऱ्याचे/प्रभारी अधिकाऱ्याचे नाव -------------------------------------------

v. संपर्क क्र ------------------------------------ई-मेल आय डी -----------------------

vi. संस्थेचा प्रकार (योग्य नसेल ते खोडावे )

निरिक्षण गृह/विशेषगृह/सुरक्षित जागा/बालगृह/खेले निवारागृह/इतर कोणतेही (तपशील द्यावा)

vii. जर संस्थेस राज्य शासना कडून अनुदान/सहाय्य प्राप्त होत असल्यास शासकीय विभागाचे नाव

viii जर शासकीय संस्था असेल:

i. संस्थेची मंजुर संख्या

ii. सदर संस्थेमध्ये १० वर्षाखालील बालक- बालिका एकत्र ठेवण्यात येतात काय? होय/नाही

जर होय असेल तर आजच्या दिवशी उपस्थित बालकांची संख्या .......................

iii. ५ ते १० वयोगटातील बालकांसाठी झोपण्याची आणि आंघोळीची स्वतंत्र व्यवस्था आहे काय? होय/नाही

iv. बालकांचे खालील वयोगटानुसार वर्गीकरण करण्यात आले आहे काय? खालील वयोगटातील बालकांची संख्या द्यावी

i. ७-११ वर्ष ------------

ii. १२-१८ वर्ष ----------

iii संस्थेत ०-५ वयोगटातील बालके राहतात काय? असल्यास संख्या ---------

iv. १८ वर्षावरील वयोगटातील बालके राहतात काय होय/नाही असल्यास संख्या द्यावी -----------

v. चालु महिन्यातील दाखल बालकांची संख्या --- ------------------

vi. निघुन गेलेल्या /मुक्त केलेल्या बालकांची संख्या --- ------------------

vii. चालु महिन्यातील बाल कल्याण समिती/बाल न्याय मंडळाने संदर्भीत केलेल्या बालकांची संख्या ---------

viii. चालु महिन्यातील बाल कल्याण समिती/बाल न्याय मंडळासमारे सादर केलेल्या बालकांची संख्या ---------

ix. मागील महिन्याच्या अखेरच्या दिनांकास उपस्थित बालकांची संख्या

x. विशेष काळजीची गरज असलेल्या बालकांची संख्या; तपशील द्यावा

xi. पुनर्वसनाकरीता केलेल्या योजना ---------------------------------------------
---------------------------------------------------------------------------
---------------------------------------------------------------------------
---------------------------------------------------------------------------
---------------------------------------------------------------------------
----------------

xii. प्रत्यक बालकाचा वैयक्तीक काळजी आराखडा तयार करण्यात आला आहे? होय/नाही

xiii. सदरचा आराखडयाची अंमलबजावणी आणि सनियंत्रण करण्यात येते काय

**क. पायाभूत सुविधा**

- इमारत
- भाडयाची ---------
- स्वत:ची---------

सी सी टी व्ही कॅमेरे प्रवेशाजवळ लावण्यात आले आहे काय होय/नाही

सुरक्षा व्यवस्था - पुरेशी/ अपुरी

मुलांना सामावून घेण्याकरीता पुरेशी जागा होय/नाही

| **खोल्यांची संख्या** | **तपशिल** |
|---|---|
| आजाऱ्यांची खोली / वैद्यकिय कक्ष | |
| समुपदेशनाची खोली | |
| बालकांसाठी मनोरंजन/कार्य कक्ष | |
| • केबल नेटवर्कसह टी व्ही संच आहे काय<br>• किती वेळ बालकांना टी. व्हि. पाहण्यासाठी देण्यात येतो<br>• बालके बैठे खेळ खेळतात काय<br>• कोणत्या खेळाचे साहित्य उपलब्ध आहे.<br>• बालके मैदानी खेळ खेळतात काय<br>• खेळाकरीता साहित्य / वस्तू उपलब्ध आहेत काय<br>• बालके सहल/ सफरीसाठी जातात काय<br>• नामांकित व्यक्तिंबरोबर संवाद साधतात काय<br>• मनोरंजनासाठी खोली उपलब्ध आहे काय | होय / नाही<br>संध्याकाळी / कोणत्याही वेळेस<br>होय / नाही<br>होय / नाही<br>होय / नाही<br>होय / नाही<br>होय / नाही<br>होय / नाही<br>होय / नाही |
| स्वंयपाकगृह / जेवणाची खोली<br>• स्वंयपाक करण्याची जागा आणि धान्य साठवण्याची जागा स्वतंत्र आहे काय<br>• प्रत्येक बालकाला स्वतंत्र ताट, वाटी, पेला मिळतो काय<br>• स्वंयपाकाची भांडी पुरेशी आणि स्वच्छ आहेत काय<br>• संस्थेमध्ये फ्रिज आहे काय<br>• संस्थेमध्ये ओव्हन आहे काय<br>• स्वंयपाकगृहात गॅस स्टोव्ह आहे काय<br>• संस्थेमध्ये धुरासाठी चिमणी आहे काय<br>• संस्थेमध्ये गॅस सिलेंडरची व्यवस्था कुठे करण्यात आली आहे.<br>• धुण्यासाठी आणि स्वंयपाकासाठी पुरेशी पाणी व्यवस्था आहे काय<br>• संस्थेमध्ये पिण्याच्या पाण्याची पुरेशी व्यवस्था आहे काय (RO) | होय / नाही<br>होय / नाही<br>होय / नाही<br>होय / नाही<br>होय / नाही<br>होय / नाही<br>होय / नाही<br>होय / नाही<br>सुरक्षित / मुलांपासून दूर<br>होय / नाही<br>होय / नाही<br>होय / नाही |

| | |
|---|---|
| • स्वंयपाक यंत्राद्वारा किंवा स्वंयपाकीद्वारा करण्यात येतो. | |
| • बालकांसाठी स्वच्छतागृहे व स्नानगृहांची संख्या<br>• फ्लश कार्यरत आहे काय<br>• वॉश बेसिनचे नळ कार्यरत आहेत काय<br>• जमीन निसरडी आहे काय<br>• निचरा होतो काय<br>• निचरा बंद आहे काय<br>• कपडे व टॉवेल वाळत घालण्यासाठी व्यवस्था आहे काय<br>• जाळे स्वच्छ करण्यात येतात काय<br>• दारांना कड्या आहेत काय<br>• दरवाजांना झलक छिद्र आहे काय<br>• बालकाच्या आंघोळीची वारंवारता काय आहे.<br>• पाणी पुरेसे उपलब्ध आहे काय<br>• बादली व मगांची संख्या पुरेशी आहे काय<br>• प्रत्येक बालकास स्वच्छतेची साधणे स्वतंत्र देण्यात आली आहेत काय<br>• धुण्याची पावडर किंवा साबण देण्यात येतो काय<br>• बालके स्वत:चे कपडे धुतात काय<br>• धोबी उपलब्ध आहे काय<br>• वॉशिंग मशिन चालू स्थितीत आहे काय | होय / नाही<br>होय / नाही<br>होय / नाही<br>होय / नाही<br>होय / नाही<br>होय / नाही<br>होय / नाही<br>होय / नाही<br>होय / नाही<br>एकदा किंवा दिवसातून त्योपक्षा जास्त<br>होय / नाही<br>होय / नाही<br>होय / नाही<br>होय / नाही<br>होय / नाही<br>होय / नाही<br>होय / नाही |
| • मैदानी खेळाकरिता खुली जागा | |
| • वर्ग खोली | |
| • व्यवसाय प्रशिक्षणाकरिता जागा | |
| • संस्थेमध्ये बालस्नेही दरवाजे आहेत काय | होय / नाही |
| • संस्थेमध्ये किती वेळा झाडणे व पुसण्याची कामे केली जातात | दिवसातून दोन वेळा किंवा त्यापेक्षा अधिक |
| • शाळेच्या वेळेत बालके स्वच्छतेच्या कामात सहभागी होतात काय | होय / नाही |
| • बालकांकरिता कुलर हिटर सुविधा उपलब्ध आहे काय | होय / नाही |
| • दरवाजे आणि खिडक्याची योग्य देखभाल होते काय | होय / नाही |
| • खोली आणि निवास व्यवस्था हवेशीर आहे काय | होय / नाही |
| • वीज नसताना पंखे आणि दिवे चालू राहण्यासाठी पर्यायी व्यवस्था आहे काय | होय / नाही |

| | |
|---|---|
| • संस्थेचा बाह्य परिसर स्वच्छ, रम्य आणि बालमैत्रीपुर्ण आहे काय | होय / नाही |
| **बालकांना पुरविण्यात येणारे कपडे / बिछाना /कपाटे / लॉकर /प्रसाधने**<br>• ऋतुप्रमाणे आणि आकारमानानुसार कपडे देण्यात येतात काय<br>• आंतरवस्त्र बदलण्याची वारंवारता<br>• नवीन कपडे शिवून घेतले किंवा विकत घेतले<br>• प्रत्येक बालकाला स्वतंत्र गादी देण्यात आली आहे काय<br>• गाद्या आणि उश्या स्वच्छ आहेत काय<br>• बालकाला स्वतंत्र कपाटे देण्यात आली आहेत काय<br>• बेडशीट आणि चादरी उपलब्ध आहेत काय<br>• हिवाळ्याकरिता ब्लँकेट उपलब्ध आहेत काय<br>• बालक संस्थेत दाखल होण्याच्या वेळी किती सेट दिले जातात<br>• नविन कपडे देण्याची वारंवारता<br>• दिलेले सेट एकाच रंगाचे किवा वेगळ्या रंगाचे आहेत काय<br>• बालकाच्या वैयक्तिक वस्तू ठेवण्याकरिता स्वतंत्र लॉकर आहे काय | <br>होय / नाही<br>होय / नाही<br>शिवून किंवा विकत<br>होय / नाही<br>होय / नाही<br>होय / नाही<br>होय / नाही<br>होय / नाही<br>होय / नाही<br>मासीक / त्रैमासिक<br>होय / नाही<br>होय / नाही |

बालकाला पुरविलेल्या इतर वस्तू ---------------------------------------------------
------------------------------------------------------------------------------------
----------------------------------------------

**ड) बालकांना पुरविण्यात येणाऱ्या सुविधा**

- वैद्यकिय सुविधा / आरोग्य पत्रिका सुविधा ------------------------------------------
  ------------------------------------------------------------------------------
  ------------------------------------------------------------------------------
  ------------------------------------------------------------------------------
  ------------------------------------------------------------------------------
  ----------------
- सकस आहार / विशेष आहार --------------------------------------------------
  ------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------
-------------------------------------------------------------------------------

- सुरक्षित पिण्याच्या पाण्याची व्यवस्था -----------------------------------------------
-----------------------------------------------------------------------------------------
----------------------------------------------------

- **बालकांची दिनचर्या**

| वेळ | कृती / कार्यक्रमाची रुपरेषा |
|---|---|
| सकाळ | |
| दिवसा | |
| दुपारी | |
| संध्याकाळी | |
| रात्री | |

- शिक्षण ( औपचारीक शिक्षण / NFE आणि जीवन कौशल्य प्रशिक्षण कार्यक्रम -------------
-----------------------------------------------------------------------------------------
-----------------------------------------------------------------------------------------
-----------------------------------------------------------------------------------------
-----------------------------------------------------------------------------------------
-----------
- संगणक / इंटरनेट / दुरध्वनी संच
- संगणकावर इंटरनेटची सुविधा उपलब्ध आहे काय होय / नाही
- सदर सुविधा कार्यरत आहे काय होय / नाही
- सुविधा बालकांना वापरण्यास परवानगी आहे काय होय / नाही
- दुरध्वनीसंच केवळ कार्यालयीन कामकाजासाठी आहे काय होय / नाही
- दुरध्वनीसंच बालकांना वापरण्यास परवानगी आहे काय निश्चीत वेळेत/ आवश्यकता भासेल तेंव्हा
- चाईल्ड लाईन क्र. १०९८ दुरध्वनी संचाजवळ दर्शनी भागात लावण्यात आला आहे काय होय / नाही
- समुपदेशन / मार्गदर्शन सुविधा/ विशेष शिक्षक /भौतिक चिकीत्सा तज्ञ इ ---------------
-----------------------------------------------------------------------------------------
-----------------------------------------------------------------------------------------
-----------------------------------------------------------------------------
- व्यवसाय प्रशिक्षण -----------------------------------------------------------------
-----------------------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------------------
---------------------------------------------------------------------------------

- मनोरंजनात्मक सुविधा ------------------------------------------------------------------
---------------------------------------------------------------------------------------
---------------------------------------------------------------------------------------
---------------------------------------------------------------------------------

- इतर यंत्रणा आणि विभागाबरोबर विकसीत केलेला संपर्क ------------------------------
---------------------------------------------------------------------------------------
---------------------------------------------------------------------------------------
-------------------------------------------------------------------------------

- Track the Missing Child कार्यक्रमाची अंमलबजावणी --------------------------------
---------------------------------------------------------------------------------------
-------------------------------------------

- Track the Missing Child पोर्टलवर बालकांची भरलेली माहिती ------------------------
---------------------------------------------------------------------------------------
---------------------------------------------------------------------------------------
------------------------------------------------------------------------

- पोर्टलचा वापर करण्याकरिता दिलेला पासवर्ड -----------------------------------------
---------------------------------------------------------------------------------------
----------------

- इतर कार्यक्रम व कृती ---------------------------------------------------------------
---------------------------------------------------------------------------------------
---------------------------------------------------------------------------------------
---------------------------------------------------------------------------------

**ई कर्मचारी तपशिल**

| अ.क्र. | नांव | पद्नाम | रुजू झाल्याचा दिनांक | भेटीच्या वेळीची उपस्थिती | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | | | | | |
| २ | | | | | |
| ३ | | | | | |
| ४ | | | | | |
| ५ | | | | | |
| ६ | | | | | |
| ७ | | | | | |
| ८ | | | | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ९ | | | | | |
| १० | | | | | |
| ११ | | | | | |
| १२ | | | | | |
| १३ | | | | | |
| १४ | | | | | |

**फ) बाल समिती / व्यवस्थापन समिती**

- बाल समिती गठीत करण्यात आली आहे काय होय / नाही
- वयानुसार बाल समित्या होय / नाही
- बाल समितीच्या बैठकीची वारंवारता होय / नाही
- व्यवस्थापन समितीचे गठण करण्यात आले आहे काय होय / नाही
- व्यवस्थापन समिती गठणाचा दिनांक व बैठकीची वारंवारता --------------------------
  --------------------------------------------------------------------------
  -------------------------------------------
- प्रशासकिय मंडळाची संस्थेच्या कामकाजात भुमिका ----------------------------------
  --------------------
- मागील वर्षाचे लेखा परिक्षण अहवाल आहेत काय होय / नाही
- मागील वर्षाचे संस्थेच्या कार्यक्रमाचे वार्षिक अहवाल आहे काय होय / नाही
- संस्थेकडून शासनाच्या इतर योजना राबविण्यात येतात काय किंवा होय / नाही
  संस्थेला शासनाच्या इतर कोणत्या योजनेंतर्गत अनुदान मिळते काय
  होय असल्यास तपशिल द्यावा

**क) ठेवण्यात आलेले अभिलेखे**

| | |
|---|---|
| कर्मचारी हजेरी नोंदवही | |
| बालकांची हजेरी नोंदवही | |
| केंद्रीय प्रवेश नोंदवही | |
| वैयक्तिक व्यक्तिचिकीत्सा नस्ती वैयक्तिक काळजी आराखड्यासह | |
| बाल कल्याण समिती / बाल न्याय मंडळ यांचेशी संपर्क | |
| बालकांचे सुचना पुस्तक<br>बालकांची सुचना पेटी | |
| वैद्यकिय नस्ती / वैद्यकिय पत्रिका | |
| मासीक पाळी नोंदवही | |
| वैयक्तिक वस्तू नोंदवही | |

| | |
|---|---|
| व्यवस्थापन समिती इतिवृत्त नोंदवही | |
| बाल समिती इतिवृत्त नोंदवही | |
| आहार नोंदवही | |
| इतर अन्य अभिलेखे | |

**निरीक्षण / शेरा** ------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------

तपासणी समितीच्या सदस्याचे नांव व स्वाक्षरी ------------------------------------------------------------------

तपासणी समितीच्या सदस्याचे नांव व स्वाक्षरी -------------------------------------------------------------------

तपासणी समितीच्या सदस्याचे नांव व स्वाक्षरी -------------------------------------------------------------------

तपासणी समितीच्या सदस्याचे नांव व स्वाक्षरी -------------------------------------------------------------------

++++++++++++++++++++++++++